सन्माननीय अध्यक्ष महोदय,

मी आपल्या अनुमतीने, सन २०१९-२० या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत प्रचंड बहुमताने मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्रात नवे सरकार सत्तारुढ झाले आहे. मा. पंतप्रधानाच्या "सबका साथ-सबका विकास-सबका विश्वास" या धोरणाला भारतीय जनतेने भरभरुन प्रतिसाद दिला. दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी मी सभागृहाला राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता.

गेल्या चार वर्षात सादर केलेल्या अर्थसंकल्पात जनतेच्या हितासाठी व सुखासाठी जे संकल्प आम्ही जनतेसमोर मांडले त्यांच्या पूर्ततेसाठी गेली साडेचार वर्षे आम्ही अथकपणे प्रयत्नशील राहिलो आहोत. या धोरणाला अनुसरुनच आज मी सन २०१९-२० या वर्षाचा राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे. आमच्या सरकारने राबविलेल्या महत्त्वाच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा, सन २०१९-२० या वर्षाच्या अर्थसंकल्पात करावयाच्या विभागनिहाय संकल्प व आर्थिक तरतुदींकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

## मदत व पुनर्वसन

**टंचाई व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना विविध योजनांद्वारे शासनाचे सहाय्य.**

१. सन २०१८ च्या खरीप व रब्बी हंगामात राज्यामध्ये पर्जन्यमान कमी झाल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. टंचाईचे निकष लक्षात घेऊन राज्यातील २६ जिल्ह्यांतील १५१ तालुक्यात दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. तसेच ज्या महसूल मंडलांमध्ये ७५० मिलीमिटरपेक्षा कमी पाऊस किंवा सरासरीच्या ७५ टक्क्यां पेक्षा कमी पर्जन्यमान किंवा खरीप हंगामात ५० पैशां पेक्षा कमी पैसेवारी आली त्या एकूण २८ हजार ५२४ गावांमध्ये दुष्काळ परिस्थिती घोषित करण्यात आली.

राज्यामध्ये झालेले शेतीचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई, चारा टंचाई या सर्व बाबींचा विचार करून केंद्र शासनास मदतीचे ज्ञापन पाठविले होते. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून राज्यास रुपये ४ हजार ५६३ कोटी एवढा भरीव निधी मदत म्हणून मंजूर केला. त्यापैकी रुपये ४ हजार २४९ कोटी एवढा निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे.

राज्याने दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा निर्धार केला. या परिस्थितीचा नेटाने सामना करण्यासाठी राज्यातील २६ जिल्ह्यांतील १५१ तालुक्यांतील १७ हजार ९८५ गावांतील शेतकऱ्यांना रुपये ४ हजार ४६१ कोटीचे अनुदान वाटप करून ६६ लक्ष ८८ हजार ४२२ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा करण्यात आलेले आहे. उर्वरित गावांतील शेतकऱ्यांच्या मदतीकरिता शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :—

(१) जमीन महसुलात सूट.

(२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.

(३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती.

(४) कृषिपंपाच्या चालू वीज देयकात ३३.५ टक्के सूट.

(५) शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी.

(६) रोजगार हमी योजनेंतर्गत कामाच्या निकषांत काही प्रमाणात शिथिलता.

(७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा.

(८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडित न करणे.

याव्यतिरिक्त जिथे दुष्काळी परिस्थिती आहे, परंतु दुष्काळ जाहीर करणे तांत्रिक कारणामुळे शक्य झाले नाही, अशा दुष्काळी परिस्थिती असलेल्या भागातील शेतकऱ्यांनासुद्धा दुष्काळी भागामध्ये देय असलेल्या योजनांचा लाभ देण्यात येईल.

**पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या अनुषंगाने उपाययोजना.**

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला. उप विभागीय अधिकारी यांना टँकर मंजुरीचे अधिकार देण्यात आले. दुष्काळी भागातील थकीत विद्युत देयकांमुळे बंद असलेल्या नळ पाणीपुरवठा योजना, थकीत विद्युत देयकाच्या ५ टक्के रक्कम टंचाई

निधीतून भरुन पुन्हा सुरु करण्यात आल्या. दुष्काळी भागातील नागरी तसेच ग्रामीण क्षेत्रातील नळ पाणीपुरवठा योजनांची नोव्हेंबर, २०१८ ते जून, २०१९ या कालावधीतील नियमित विद्युत देयके टंचाई निधीमधून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. टंचाई अंतर्गत उपाययोजनांची कामे करण्यासाठी विहित निविदा कालावधी कमी करण्यात आला. पिण्याच्या पाण्याच्या टँकरच्या भाडेदरात वाढ करण्यात आली. चारा छावण्यांना टंचाई अंतर्गत निधीमधून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला. टंचाई निवारणार्थ अधिग्रहित केलेल्या विहिरींच्या मोबदल्याचे दर सुधारित करण्यात आले. टंचाई अंतर्गत उपाययोजना हाती घेताना गावे, वाड्या, नागरी क्षेत्रातील कायमस्वरुपी अस्तित्वात असलेल्या सध्याच्या लोकसंख्येनुसार पिण्याच्या पाण्याची मागणी विचारात घ्यावी असा निर्णय घेण्यात आला. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ मंजूर करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना व नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी दिनांक १५ जून, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. दिनांक १० जून, २०१९ रोजी राज्यामध्ये ५ हजार २४३ गावे, ११ हजार २९३ वाड्या-वस्त्यांमध्ये ६ हजार ५९७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी ९ हजार ९२५ विहीरी, विंधन विहिरी अधिग्रहीत करण्यात आल्या असून २ हजार ४३८ तात्पुरत्या नळ पाणीपुरवठा योजना व विशेष दुरुस्ती योजनांस मंजुरी देण्यात आलेली आहे.

**चारा छावण्या.** चारा टंचाईवर मात करण्यासाठी अतिरिक्त चारा उत्पादनाचा कार्यक्रम हाती घेऊन ३० हजार हेक्टर गाळपेर जमीन अल्प मुदतीच्या करारावर देऊन २९.४ लक्ष मेट्रीक टन चारा उत्पादन केले, त्यामुळे अनेक भागात चारा टंचाईची झळ कमी झाली.

राज्यामध्ये, दिनांक १० जून, २०१९ रोजीपर्यंत १ हजार ६३५ चारा छावण्या सुरु करण्यात आल्या असून, त्यामध्ये ११ लक्ष ४ हजार ९७९ पशुधन दाखल आहे. शेळी व मेंढी यांच्यासाठी चारा छावण्या उभारण्याचा निर्णय प्रथमच घेण्यात आला आहे.

चारा छावण्यांतील पशुधनाच्या अनुदानात वाढ करण्यात आली असून ते मोठ्या पशुंसाठी प्रतिदिन रुपये ७० वरुन रुपये १०० व छोट्या पशुंसाठी रुपये ३५ वरुन रुपये ५० करण्यात आले.

संवाद सेतू. मा. मुख्यमंत्री महोदयांनी राज्यातील २२ जिल्ह्यांतील १३९ तालुक्यांतील लोकप्रतिनिधी, सरपंच, अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी यांचेशी टंचाई परिस्थितीत येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी संवाद सेतूच्या माध्यमातून संपर्क साधला. २७ हजार ४४९ लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी त्यात सहभाग घेतला. ८८४ सरपंचांनी संवाद सेतूद्वारे समस्या मांडल्या व व्हॉटस्ॲपद्वारे दुष्काळाशी संबंधित तक्रारी नोंदविल्या. त्यावर तत्परतेने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

कृत्रिम पाऊस. सन २०१९ च्या मान्सून कालावधीत अनुकूल वातावरणाचा उपयोग करुन पर्जन्यवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे कृत्रिम पाऊस पाडण्याच्या प्रयोगास मान्यता देण्यात आली आहे.

नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ. रुपये ६ हजार ४१० कोटी एवढी तरतूद अर्थसंकल्पात असून त्यानंतरही आवश्यकता भासल्यास अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

## कृषि व संलग्न सेवा

शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट मा. प्रधानमंत्री यांनी ठरविले आहे. या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी मागील चार वर्षात शेतकरी केंद्रीत अनेक धोरणे शासनाने ठरविली आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी शासनाने सिंचन, मृद व जलसंधारण, कृषि व पदुम या क्षेत्रात तसेच दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांकरिता विशेष योजना राबविल्या आहेत.

सिंचन. २. सिंचन सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना, बळीराजा जलसंजीवनी योजना आणि अन्य सिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून मागील साडेचार वर्षात ३ लक्ष ८७ हजार हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता आणि १ हजार ९०५ दशलक्ष घनमीटर (६७ टीएमसी) पाणीसाठा निर्माण झाला आहे. मागील साडेचार वर्षात १४० सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात आले असून त्यामध्ये बावनथडी मोठा प्रकल्प, नांदूर मधमेश्वर प्रकल्प, डोंगरगाव प्रकल्प, निम्न पांझरा मध्यम प्रकल्प व उर्ध्व कुंडलिका प्रकल्पांचा समावेश आहे.

**प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना.**

३. महाराष्ट्रातील २६ अपूर्ण सिंचन प्रकल्पांचा समावेश प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेत करण्यात आला. सदर प्रकल्पांची उर्वरित किंमत रुपये २२ हजार ३९८ कोटी असून त्यापैकी रुपये ३ हजार १३८ कोटी केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त होणार आहे. उर्वरित रक्कम राज्य हिश्श्याची आहे. या योजनेमुळे ५ लक्ष ५६ हजार हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता व ४७ टीएमसी पाणीसाठा निर्माण होणार आहे. मार्च २०१९ अखेर ५ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात आले असून जून २०१९ अखेर ५ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत. उर्वरित सिंचन प्रकल्प डिसेंबर, २०२० पर्यंत पूर्ण होतील. गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प डिसेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता रुपये २ हजार ७२० कोटी एवढी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

**बळीराजा जलसंजीवनी योजना.**

४. शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हे तसेच अवर्षणप्रवण भागातील सिंचन प्रकल्प कालबद्ध रितीने पूर्ण करण्याकरिता केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याने बळीराजा जलसंजीवनी योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत विदर्भ व मराठवाड्यातील ८३ लघुपाटबंधारे प्रकल्प, ३ मोठे व मध्यम प्रकल्प तसेच उर्वरित महाराष्ट्रातील ५ मोठे व मध्यम प्रकल्प अशा ९१ प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पांची उर्वरित किंमत रुपये १५ हजार ३२६ कोटी असून त्यापैकी रुपये ३ हजार ८३१ कोटी केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त होणार आहे. उर्वरित रुपये १० हजार २१३ कोटी रक्कम राज्य हिश्श्याची आहे. या सिंचन प्रकल्पांना नाबार्ड पायाभूत विकास अर्थसहाय्य (NIDA) व ग्रामीण पायाभूत विकास निधी (RIDF) मधून कर्ज घेण्याचा करारनामा करण्यात आला आहे. बळीराजा जलसंजीवनी योजनेकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता रुपये १ हजार ५३१ कोटी एवढी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

५. अनेक जलसिंचन प्रकल्पांची कामे सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी रखडली होती. गेल्या साडेचार वर्षात २६० जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन प्रकल्पांच्या कामांना गती देण्यात आलेली आहे.

नलिका वितरण प्रणाली.

६. खुल्या कालव्याऐवजी नलिका वितरण प्रणालीद्वारे सिंचनाचे धोरण अंमलात आणल्यामुळे भूसंपादनाच्या खर्चात बचत होत आहे. १०९ सिंचन प्रकल्पांच्या ६.१५ लक्ष हेक्टर सिंचन क्षेत्रावर नलिका वितरण प्रणालीची कामे प्रस्तावित असून यापैकी ५९ हजार ४१२ हेक्टर सिंचन क्षेत्रावर ही कामे पूर्ण झाली आहेत व १ लक्ष ९७ हजार हेक्टर क्षेत्रावर कामे प्रगतीत आहेत.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी जलसंपदा विभागाकरिता रुपये १२ हजार ५९७ कोटी १३ लक्ष ८९ हजार तरतूद प्रस्तावित आहे. सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी उपलब्ध करण्यात येईल.

## मृद व जलसंधारण

जलयुक्त शिवार अभियान.

७. टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी एकात्मिक पद्धतीने नियोजनबद्धरित्या कृती आराखडा तयार करून " जलयुक्त शिवार अभियान " ही योजना डिसेंबर, २०१४ पासून राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत दरवर्षी ५ हजार गावे याप्रमाणे ५ वर्षात २५ हजार गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ पर्यंत निवडण्यात आलेल्या एकूण २२ हजार ५९० गावांपैकी १८ हजार ६४९ गावांमध्ये पाण्याच्या ताळेबंदानुसार निश्चित करण्यात आलेली सर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या गावांमध्ये ६ लक्ष २ हजार मृद व जलसंधारणाची कामे पूर्ण झाली असून २६.९० टीएमसी पाणीसाठा क्षमता निर्माण झाली आहे. या योजनेवर रुपये ८ हजार ९४६ कोटी खर्च करण्यात आला आहे.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार.

८. " गाव करी ते राव न करी " अशी आपल्याकडे एक म्हण आहे. राज्यातील धरणामधील गाळ काढणे व तो शेतामध्ये वापरणे याकरिता " गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार " ही योजना लोकसहभागातून राबविण्यात आली आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत ५ हजार २७० जलाशयातून ३.२३ कोटी घनमीटर इतका गाळ उपसण्यात आला असून ३१ हजार १५० शेतकऱ्यांना याचा लाभ झाला आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मृद व जलसंधारण विभागाकरिता रुपये ३ हजार १८२ कोटी २८ लक्ष ७४ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

## रोजगार हमी योजना

मागेल त्याला शेततळे.

९. दुष्काळी भागात शाश्वत सिंचन निर्माण करण्याकरिता " मागेल त्याला शेततळे " ही महत्त्वाची योजना आहे. या योजनेंतर्गत ७ विविध आकारमानाची शेततळी अनुज्ञेय असून, लाभार्थ्यास शेततळ्याच्या आकारमानानुसार जास्तीत जास्त रुपये ५० हजार इतके अनुदान अनुज्ञेय आहे. या योजनेत १ लक्ष १२ हजार शेततळ्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते मात्र योजनेस मिळालेला प्रचंड प्रतिसाद लक्षात घेता मागील चार वर्षात मागेल त्याला शेततळी व इतर योजनेतून १ लक्ष ६७ हजार शेततळयांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये २५ हजार शेततळे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून, याकरिता रुपये १२५ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्य अभिसरण आराखड्याची अंमलबजावणी.

१०. शासनाने विविध विभागांच्या योजनांची रोजगार हमी योजनेशी सांगड घालण्याचे धोरण निश्चित केले आहे. या अभिसरण धोरणामुळे योजनांतून निर्माण होणाऱ्या मत्तांची गुणवत्ता व उत्पादकता वाढीस लागणार आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अभिसरणाद्वारे घेण्यात येणाऱ्या २८ प्रकारच्या कामांच्या कुशल खर्चासाठी रुपये ३०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे, तो या आर्थिक वर्षात उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

## कृषि

" जिथे समृद्ध कृषि ! तिथे राज्याची सरशी ! " असे म्हटले जाते. राज्यातील रोजगार निर्मितीमध्ये कृषिचे स्थान अनन्यसाधारण आहे. कृषि क्षेत्रात जसजशी प्रगती होत गेली तसतशी रचनात्मक स्थित्यंतरे होत गेली. सुधारित कृषि तंत्रज्ञान, कृषि प्रक्रिया व शेतमालाची निर्यात, कृषि पुरक उद्योग यावर शासनाकडून भर दिला आहे. कृषि विभागाच्या काही महत्त्वाच्या तरतुदीकडे मी आपले लक्ष वेधित आहे.

सूक्ष्म सिंचन.

११. प्रत्येक थेंबातून अधिक पिक " Per Drop More Crop " ही काळाची गरज आहे. राज्यातील मर्यादित जलसंसाधनाचा महत्तम वापर करण्याकरिता शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. याकरिता सूक्ष्म

सिंचनासाठी शेतकऱ्यांना देण्यात येत असलेल्या अनुदानाची मर्यादा वाढविण्याचा शासनाचा मानस आहे, यासाठी रुपये ३५० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे.

**स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी.**

१२. हवामानाचा अचूक अंदाज येण्यासाठी महसुली मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. राज्यातील २ हजार ६५ महसूल मंडळापैकी २ हजार ६१ महसूल मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्राची यशस्वी उभारणी झाली असून, उर्वरित मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्राच्या उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

**प्रधानमंत्री पिकविमा योजना व हवामानावर आधारित फळ पिक विमा योजना.**

१३. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ५२ लक्ष २६ हजार शेतकऱ्यांना रुपये २ हजार ६८८ कोटी ८१ लक्ष इतकी नुकसानभरपाई विमा कंपन्यांमार्फत मंजूर करण्यात आली असून, शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आली आहे. सन २०१८-१९ मध्ये खरीप व रब्बी हंगामामध्ये १ कोटी ३९ लक्ष ९८ हजार शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेत सहभाग घेतला असून, ८३ लक्ष २७ हजार हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. विमा कंपन्यांमार्फत खरीप हंगामातील २३ लक्ष ५ हजार शेतकऱ्यांना रुपये ३ हजार ३९७ कोटी ७४ लक्ष नुकसानभरपाईचे वाटप करण्यात आले आहे. नुकसानभरपाई संदर्भात काही ठिकाणी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत अशा ठिकाणी या तक्रारींचे निवारण करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना.**

१४. लोकनेते स्वर्गीय श्री. गोपीनाथजी मुंडे महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी जनतेचे आधारस्तंभ होते. शेतकऱ्यांसोबत असलेल्या त्यांच्या बांधिलकीचा सन्मान करीत आम्ही शेतकऱ्यांसाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुधारणांसह अंमलात आणीत आहोत. शेतकऱ्यांचा दुर्देवी अपघात झाल्यास योजनेच्या निकषानुसार शासनाने नियुक्त केलेल्या विमा कंपनीकडून रुपये २ लाखाच्या मर्यादेत नुकसान भरपाई देण्यात येते. सद्य:स्थितीत राज्यातील सुमारे १ कोटी ३७ लक्ष वहीतीधारक खातेदार शेतकऱ्यांच्या वतीने विमा कंपन्यांना विमा हप्ता प्रदान करण्यात येत आहे. या योजनेची व्याप्ती वाढविण्याचे प्रस्तावित असून, या योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या कुटुंबालाही योजनेचा लाभ देणे प्रस्तावित आहे. त्यातून सुमारे साडेपाच कोटी जनतेस विमाछत्र उपलब्ध होईल. याकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये २१० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे.

**कृषि विद्यापीठे आणि नवीन कृषि महाविद्यालये.** १५. राज्यातील चार कृषि विद्यापीठांना संशोधन व इतर भौतिक सुविधांकरिता तीन वर्षात प्रत्येकी रुपये १५० कोटी असे एकूण रुपये ६०० कोटी उपलब्ध करुन द्यावयाचे ठरविण्यात आले असून, त्यापैकी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात प्रत्येकी रुपये ५० कोटी प्रमाणे रुपये २०० कोटी इतका नियतव्यय चार कृषि विद्यापीठांकरिता राखून ठेवण्यात आलेला आहे.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात कृषि शिक्षणाला प्रोत्साहन देण्याकरिता डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांतर्गत मूल, जि. चंद्रपूर येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव, ता. जामखेड, जि. अहमदनगर, शासकीय अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ आणि क्रांतीसिंह नाना पाटील अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, पेठ, जि. सांगली स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री कृषि आणि अन्न प्रक्रिया योजना.** १६. राज्यात अन्न प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री कृषि आणि अन्न प्रक्रिया योजना दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत ४६ प्रकल्पांना मान्यता दिली आहे.

**गट शेतीस प्रोत्साहन.** १७. सन १९७०-७१ मध्ये वहिती जमिनीचे प्रति खातेदार सरासरी क्षेत्र ४.२८ हेक्टर होते. वाढती लोकसंख्या व जमिनीचे तुकडीकरण यामुळे हे क्षेत्र सन २०१६-१७ मध्ये १.४ हेक्टर एवढे कमी झाले आहे. शेतकऱ्याला शेती करणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर व्हावे यासाठी गट शेतीस प्रोत्साहनाची नवीन योजना सन २०१७-१८ मध्ये सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के अथवा जास्तीत जास्त रुपये १ कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. या योजनेंतर्गत आतापर्यंत २०५ गट स्थापन करण्यात आले आहेत. या योजनेतून संघटित शक्तीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. जास्तीत जास्त नवीन गटांची स्थापना करण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये या योजनेसाठी रुपये १०० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवला आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART).

१८. " असेल बाजारपेठ तर फायदा थेट " असे बोलल्या जाते. राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषि उत्पादनांना थेट बाजारपेठ मिळावी व त्यांना शेतमाल विक्रीच्या कामी मूल्य साखळीमध्ये (Value Chain) आवश्यक सर्व पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्यांना थेट खरेदीदार कंपन्यांसोबत जोडून राज्यात विविध पिकांच्या मूल्यसाखळयांची निर्मिती करण्यात येणार आहे. सदर प्रकल्प अंदाजे रुपये २ हजार २२० कोटी किमतीचा आहे.

काजू प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन.

१९. महाराष्ट्र हे काजू उत्पादनात देशात अग्रेसर आहे. राज्यातील काजुला परदेशात मोठी मागणी आहे. काजू निर्यातीतून देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त होते. उत्पादनाच्या तुलनेत प्रक्रिया उद्योग पुरेसे नसल्याने ते वाढविण्याची आवश्यकता आहे. ही आवश्यकता लक्षात घेता काजू प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. काजू प्रक्रिया उद्योगाचा मोठ्या प्रमाणात विस्तार करण्यासाठी आगामी काळात रुपये १०० कोटी उपलब्ध करुन देण्यात येतील याचा फायदा काजू उत्पादक शेतकरी व प्रक्रिया उद्योग या दोन्हींना होईल.

## पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास

शेतकऱ्यांना शेतीसोबतच शेतीवर आधारित उद्योग करण्यास प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. शासनामार्फत शेतीवर आधारित जोडधंद्यांना प्रोत्साहन देण्याकरिता विविध योजना राबविण्यात येत आहेत. पदुम विभागाच्या महत्त्वाच्या तरतुदींकडे मी आपले लक्ष वेधित आहे.

दुध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान.

२०. राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाचा योग्य मोबदला मिळण्यासाठी पिशवी बंद दुध वगळून उर्वरित दुधास प्रति लिटर रुपये ५ इतके अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत राज्यातील सहकारी दुध संघ व खाजगी दुग्ध उद्योजक अशा एकूण ४२ संस्थांना या योजनेचा लाभ देण्यात आला तसेच राज्यातील दुध संघ व खाजगी दुग्ध प्रक्रिया उद्योग यांना दुध भुकटी निर्यातीस प्रोत्साहन म्हणून प्रति किलो रुपये ५० अनुदान देण्यात आले. या योजनेकरिता आतापर्यंत रुपये ४७४ कोटी ५२ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

फिरते पशुवैद्यकीय चिकित्सालय स्थापन करणे (मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना).

२१. राज्यातील दुर्गम, डोंगराळ, आदिवासी बहुल भागातील पशुपालकांकडील पशुरुग्णांसाठी पहिल्या टप्प्यात ८० तालुक्यांमध्ये फिरती पशुचिकित्सा पथके स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. याकरिता रुपये १६ कोटी ७४ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र.

२२. " गोवर्धन गोवंश सेवा केंद्र " या योजनेत आतापर्यंत रुपये १७ कोटी एवढा निधी खर्च झालेला आहे. सन २०१९-२० या वर्षात या योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली असून, राज्यातील प्रत्येकी महसुली उपविभागात एक याप्रमाणे एकूण १३९ गोशाळांना प्रत्येकी रुपये २५ लक्ष इतके अनुदान देण्यात येणार आहे. याकरिता रुपये ३४ कोटी ७५ लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

नीलक्रांती अभियान.

२३. महाराष्ट्राला ७२० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून सागरी मासेमारी तसेच अंतर्गत मासेमारीचा विचार करता मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी महाराष्ट्रात मोठा वाव आहे. त्या दृष्टीने शासन विविध योजना राबवित असून त्यात प्रामुख्याने ससूनगोदी बंदराचे आधुनिकीकरण, रायगड जिल्ह्यातील करंजा येथील मासेमारी बंदराची निर्मिती, वाघेश्वर, ता. वेंगुर्ला, जि.सिंधुदूर्ग येथे खेकडा, जिताडा व कालव मत्स्यबीज उत्पादन केंद्राची निर्मिती, पार्डी, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मत्स्यविज्ञान महाविद्यालयाची स्थापना, ९० टक्के अनुदानावर शेतकरी गटांना मासळी विक्रीसाठी फिरते वाहन इत्यादि योजनांचा समावेश आहे.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७.

२४. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ ची राज्यात अंमलबजावणी सुरु आहे. सद्यस्थितीत ५०.२७ लाख खातेदारांसाठी रुपये २४ हजार १०२ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. सदर योजनेचा लाभ अधिक लाभार्थ्यांना व्हावा यासाठी योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे आणि त्यामध्ये खावटी कर्जाचा समावेश करण्यात आला आहे. तांत्रिक किंवा तत्सम इतर कारणामुळे या योजनेसाठी यापूर्वी अपात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्याकरिता शासन लवकरच निर्णय घेणार आहे. शेतकऱ्याच्या कर्जमुक्तीसाठी शासन कटीबद्ध असून शेवटचा पात्र शेतकरी कर्जमुक्त होईपर्यंत शासनाकडून या योजनेसाठी कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू दिला जाणार नाही.

अटल अर्थसहाय्य योजना.

२५. विविध सहकारी संस्थांच्या कृषि, कृषिपुरक व बिगर कृषि नाविण्यपूर्ण प्रकल्पांना आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या प्रकल्पांना अर्थसहाय्य देण्याकरिता रुपये ५०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

भावांतर योजना. २६. भावांतर योजनेअंतर्गत ९ हजार ३४३ तूर उत्पादक शेतकऱ्यांना रुपये ११२ कोटी ६७ लाख आणि ९६ हजार ६११, हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना रुपये १३० कोटी ५६ लाख अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. कांदा उत्पादक १ लाख ६० हजार ६९८ लाभार्थी शेतकऱ्यांना रुपये ११४ कोटी ८० लाख अनुदान वितरीत करण्यात आले आहेत, या आर्थिक वर्षात आणखी रुपये ३९० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

## पायाभूत सुविधा

रस्ते विकास. २७. दर्जेदार रस्त्यांच्या आधारावरच समृद्धीचा मार्ग सुकर होत असतो. राज्यात आतापर्यंत राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग मिळून एकूण २ लाख ९९ हजार ४४६ कि.मी. पेक्षा जास्त लांबीचे रस्ते विकसित करण्यात आले आहेत. रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ मध्ये एकूण ३ लाख ३६ हजार ९९४ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना. २८. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सन २०१५-१६ ते सन २०१९-२० या कालावधीकरिता ३० हजार कि.मी. लांबीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून त्यावर रुपये १८ हजार १५० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. आतापर्यंत २९ हजार ७६ कि.मी. लांबीच्या ७ हजार २८४ कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली असून त्यापैकी ८ हजार ८१९ कि.मी. लांबीची कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित २० हजार २५७ कि.मी. लांबीची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामासाठी आशियाई विकास बँकेकडून रुपये ४ हजार २५४ कोटी एवढे कर्ज उपलब्ध होणार आहे.

समृद्धी महामार्ग. २९. नागपूर-मुंबई हा ७०१ कि.मी. लांबीच्या शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग (समृद्धी महामार्ग) तयार करण्याची घोषणा दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी मा. मुख्यमंत्री यांनी विधानसभेत केली होती. समृद्धी महामार्ग १० जिल्हे, २६ तालुके व ३९० गावांमधून जाणार असून यावर सुमारे रुपये ५५ हजार ३३५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदर महामार्गाचे काम दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी सुरु करण्यात आलेले आहे. सदर महामार्गाच्या बांधकामाचे १६ पॅकेजेसमध्ये नियोजन केले असून १६ पैकी १४ पॅकेजेसचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदर काम अत्यंत जलदगतीने सुरू आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची सुधारणा.

३०. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाची लांबी ९४.५ कि.मी. असून हा महामार्ग सन २००२ मध्ये वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता. मुंबई-पुणे या दोन मोठ्या शहरातील प्रवासाच्या वेळेत बचत करण्याकरिता मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर कमी करण्याचे प्रस्तावित असून या प्रकल्पावर रुपये ६ हजार ६९५ कोटी इतका खर्च अपेक्षित असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

ठाणे खाडी पूल-३.

३१. सायन-पनवेल महामार्गावरील ठाणे खाडीवर तिसऱ्या खाडी पुलाचे बांधकाम करण्यासाठी रुपये ७७५ कोटी ५८ लक्ष इतक्या किमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्प खाजगी सहभागातून राबविण्यात येत असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

वांद्रे-वर्सोवा सागरी मार्ग **(Sea Link)**.

३२. वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतूची उभारणी व अनुषंगिक कामे करण्यात येत आहेत. सदर प्रकल्पाची किंमत रुपये ११ हजार ३३२ कोटी ८२ लक्ष इतकी आहे. सदर काम पाच वर्षात पूर्ण करण्याचे नियोजित असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

शिवडी न्हावा शेवा मुंबई पारबंदर प्रकल्प.

३३. मुंबई पारबंदर प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. २२ कि.मी. लांबीच्या या प्रकल्पाची किंमत रुपये १७ हजार ८४३ कोटी असून कामास मार्च २०१८ पासून सुरुवात झाली आहे. सदर प्रकल्प सप्टेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकरिता रुपये १६ हजार २५ कोटी ५० लक्ष ९६ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची लोकसंख्या ११ कोटी २४ लक्ष इतकी असून नागरी लोकसंख्येची टक्केवारी ४५.२ इतकी आहे. राज्यात एकूण ३९६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. नगरविकास विभागाच्या काही महत्त्वाच्या तरतुदीकडे मी आपले लक्ष वेधित आहे.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान.

३४. राज्यातील सर्व नगरपरिषदा, नगरपंचायती व 'ड' वर्ग महानगरपालिकांच्या क्षेत्रात नागरी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात आतापर्यंत रुपये ७ हजार ६४४ कोटी किमतीचे १४५ पाणीपुरवठा, मलनिस्सारण व रस्ते प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. आतापर्यंत रुपये २ हजार २०० कोटी किमतीचे ४० प्रकल्प पूर्ण करण्यात आले असून उर्वरित प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी नगरविकास विभागाकरिता एकत्रित रुपये ३५ हजार ७९१ कोटी ८३ लक्ष ६८ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

**कृषि पंपाचे ऊर्जीकरण.**

३५. शेतकऱ्याकडून कृषि पंप वीज जोडणीसाठी असलेली मागणी लक्षात घेऊन मागील ४ वर्षात ५ लाख २६ हजार ८८४ कृषि पंपांना वीज जोडणी देण्यात आली असून यावर ५ हजार ११० कोटी ५० लाख इतका खर्च करण्यात आलेला आहे. सामान्यतः एका कृषी पंपामुळे पाच एकर जमीन ओलीताखाली येते. सन २०१८-१९ करिता ७५ हजार कृषि पंपांना वीज जोडणी देण्याचे उद्दिष्ट असून याकरिता रुपये १ हजार ८७५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**वीज दरात सवलत.**

३६. मागील चार वर्षात कृषि ग्राहकांना रुपये १५ हजार ७२ कोटी ५० लक्ष, यंत्रमाग धारकांना ३ हजार ९२० कोटी १४ लक्ष व औद्योगिक ग्राहकांना ३ हजार ६६२ कोटी २९ लक्ष वीज दराच्या सवलतीपोटी अनुदान देण्यात आले आहे.

**उच्चदाब वितरण प्रणाली.**

३७. कृषि ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठा करण्याकरिता तसेच वितरणामधील हानी कमी होण्याकरिता उच्चदाब वीज वितरण प्रणाली कार्यान्वित करण्याचा शासनाने निर्णय घेऊन अंमलबजावणी सुरु केलेली आहे. उच्चदाब वीज प्रणाली कृषि पंप वीज जोडण्या देण्याकरिता वापरणे किफायतशीर असल्याने सदर प्रणाली कृषी पंप वीज जोडण्यांसाठी वापरण्याकरिता मागील वर्षी तसा निर्णय घेण्यात आला आहे, यासाठी रुपये ५ हजार ४८ कोटी १३ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

**अती उच्चदाबाची नवीन वीज उपकेंद्रे स्थापन करणे.**

३८. राज्यातील वीज वितरण प्रणालीची क्षमता वाढविणे आणि वीज वितरण प्रणालीचे वृद्धीकरण व आधुनिकीकरण करण्याकरिता नवीन उपकेंद्रे उभारण्याचे व जुन्या उपकेंद्रांच्या क्षमतेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या योजनेंतर्गत राज्यात ४९३ उपकेंद्रे आणि २१२ उपकेंद्रांची क्षमता वृद्धी करण्यात आलेली आहे.

**नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथे नव्या विद्युत प्रकल्पास मान्यता.**

३९. नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथे १३२० मे.वॅ. क्षमतेचा औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्प उभारण्यास तत्वतः मान्यता देण्यात आलेली आहे. यासाठी रुपये ८ हजार ४०७ कोटी खर्च अपेक्षित आहे.

**एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था.**

४०. सन २०१८-१९ चा अर्थसंकल्प मांडताना सन २०२५ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर म्हणजे रुपये ७० लक्ष कोटी, करण्याबाबतचे सुतोवाच केले होते. या उद्दिष्टाची पूर्तता करण्याचे मोठे आव्हान आपण स्विकारले आहे. हे उद्दिष्ट साध्य करताना आपल्याला राज्यातील सर्वसामान्य जनता, उद्योजक, शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, विविध क्षेत्रातील विषयतज्ञ या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. त्या दृष्टीने शास्त्रशुद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने वाटचाल करताना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित अर्थतज्ञ, विशेषज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन आवश्यक आहे. राज्य शासनाने यासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे पुनरुज्जीवन करण्याचे ठरविले आहे. यासाठी सन २०१९-२० मध्ये रुपये २० कोटी एवढा नियतव्यय राखून ठेवला आहे.

**नवीन औद्यौगिक धोरण २०१९.**

४१. दिनांक ७ मार्च २०१९ रोजी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. राज्याला जागतिक स्तरामध्ये गुंतवणुकीचे उत्पादनाचे केंद्र बनवून १० लाख कोटी गुंतवणूक आकर्षित करुन त्यातून ६० लाख नवीन रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यास अनुसरुन राज्यातील होतकरु युवक, युवतींसाठी राज्याची सर्वसमावेशक स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारा “मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम” सुरु करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत या वर्षात जवळपास १० हजार लघु उद्योग सुरु करण्याचे नियोजन असून या योजनेत महिलांना तसेच अनुसूचित जाती जमातींसाठी प्राधान्य देण्यात येईल.

४२. मोठ्या उद्योगांच्या तुलनेत सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांमध्ये कमी गुंतवणुकीतून जास्त रोजगार निर्मितीची क्षमता आहे. ही बाब लक्षात घेता सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग वाढीवर शासनाचा भर राहणार असून, त्या माध्यमातून जास्तीत जास्त रोजगार निर्मिती करण्याचा शासनाचा हेतू आहे. राज्यातील प्रत्येक तालुकास्तरावर सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगाकरिता पार्क तयार करण्यात येतील. सुरुवातीला पथदर्शी प्रकल्प म्हणून ५० तालुक्यांमध्ये सदर पार्कची निर्मिती प्रस्तावित आहे. या योजनेंतर्गत विकसित केलेल्या भूखंडापैकी ३० टक्के भूखंड महिला उद्योजकांकरिता राखीव ठेवण्यात येणार आहेत. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात या योजनांसाठी रुपये ३०० कोटी एवढा नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

खनिज ई-लिलाव.

४३. राज्यातील प्रमुख खनिज ई-लिलाव अंतर्गत आतापर्यंत एकूण १६ खनिज क्षेत्रांपैकी १३ खनिज क्षेत्र लिलावांना प्रतिसाद मिळाला. देशात प्रथमच एकत्रितपणे दहा खनिज क्षेत्राचा लिलाव यशस्वी होणे ही राज्याच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब आहे. या खनिजक्षेत्र लिलावामुळे सुमारे ३ हजार ५६२ कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल राज्यास प्राप्त होणार आहे. तसेच नागपूर, कोल्हापूर, रत्नागिरी व चंद्रपूर या जिल्ह्यातील खनिज क्षेत्र परिसरात मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे.

**नवीन वस्त्रोद्योग धोरण.**

४४. सन २०१८-२०२३ या कालावधीकरिता शासनाने नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले. या धोरणांतर्गत यंत्रमाग घटकासोबत सहकारी व खाजगी सुत गिरण्या, निटिंग, होजीअरी, गारमेंटिंग या व अशा इतर वस्त्रोद्योग घटकांना रुपये २ ते रुपये ३.७७ प्रति युनिट प्रमाणे वीज दरात सवलत लागू करण्यात आली आहे. या बाबीकरिता रुपये ५४० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या व्याज अनुदानापोटी रुपये ३६७ कोटी ८३ लाख मागील ४ वर्षात वितरित करण्यात आले, तसेच वस्त्रोद्योग घटकांना १० टक्के अर्थसहाय्य म्हणून रुपये १८० कोटी ८९ लाख एवढा निधी देण्यात आला आहे.

**सहकारी सुतगिरण्याच्या मदतीसाठी आकृतीबंधात सुधारणा.**

४५. सहकारी तत्वावरील वस्त्रोद्योगास प्रोत्साहन देण्यासाठी सहकारी सूतगिरण्यांसाठी अर्थसहाय्याच्या सध्याच्या १०:३०:६० असा असलेला आकृतीबंध सुधारित करुन त्याऐवजी सभासद भागभांडवल ५ टक्के, शासकीय भागभांडवल ४५ टक्के व कर्ज ५० टक्के (५:४५:५०) याप्रमाणे करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**गावठाण जमाबंदी प्रकल्प.**

४६. गावठाण कार्यक्षेत्रातील बांधकाम परवाने, कर निर्धारण योग्य पद्धतीने करण्याकरिता अधिकारिक नकाशे व भूमापन उपलब्ध असणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व गावांच्या गावठाणांची मोजणी ड्रोन व तत्सम अत्याधुनिक तंत्रज्ञानाव्दारे करण्याकरिता सुमारे ३६ महिने कालावधी अपेक्षित आहे. या प्रकल्पाअंतर्गत राज्यातील ३९ हजार ७३३ गावांचे जीआयएस मॅपींग करण्यात येणार असून याकरिता रुपये ३७४ कोटी खर्च अपेक्षित आहे.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह बांधणे.**

४७. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मरणार्थ ग्रामीण भागातील ६१ गावांमध्ये सामाजिक सभागृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून यापैकी ५७ गावांकरिता रुपये ३५.६४ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या आर्थिक वर्षामध्ये अजून काही गावांमध्ये अशी सामाजिक सभागृह प्रस्तावित आहेत. तसेच सार्वजनिक जयमल्हार व्यायाम शाळा आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती संग्रहालय उभारण्याचे प्रस्तावित आहे.

**तीर्थक्षेत्रांचा विकास.**

४८. राज्यातील श्रीक्षेत्र कपिलधारा ता. जि. बीड, श्रीसंत सेवालाल महाराज पोहरादेवी, ता. मानोरा, जि. वाशिम, कुणकेश्वर, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग व अंगणेवाडी, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग, सद्गुरु सखाराम महाराज अमळनेर, जि. जळगाव, निवृत्तीनाथ मठ, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक या तीर्थक्षेत्रातील यात्रेकरुंच्या सोयीकरिता पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत रुपये ५० कोटी इतका निधी राखून ठेवण्यात आला आहे. तसेच आवश्यकतेनुसार अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती.**

४९. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती यावर्षी देश साजरी करतो आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची विचारतत्वे देशातील व जगभरातील तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम राबविले जाणार आहेत. महात्मा गांधीचे विचार व तत्त्वे देशातील आणि जगभरातील नवीन पिढीमध्ये पोहचविण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधीजीच्या १५० व्या जयंती निमित्त केंद्र शासन, राज्य शासन आणि दोन्ही शासनाच्या संयुक्तपणे विविध कार्यक्रम राबविले जाणार आहेत. सन २०१९-२० या वर्षामध्ये रुपये १५० कोटी एवढा नियतव्यय यासाठी राखून ठेवण्यात आलेला आहे.

**ग्राम अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण.**

५०. खेडी स्वयंपूर्ण व्हावी या उद्देशाने गांधीजींनी "खेड्याकडे चला" असे आवाहन भारतीय जनतेला केले होते. त्यांच्या १५० व्या जयंती निमित्त त्यांचे हे आवाहन प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा आमचा संकल्प आहे. या दृष्टीने ग्रामव्यवस्थेचे सक्षमीकरण करण्याचा शासनाचा मानस आहे. यात प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेचे प्रमुख घटक असलेले बारा बलुतेदार उदा. कुंभार, कोळी, गुरव, तेली, न्हावी, परीट, माळी, लोहार, सुतार इत्यादींचे सक्षमीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत कुटीरउद्योग, लघुउद्योग यांना प्रोत्साहन देण्याचे नियोजन आहे. यासाठी खादी ग्रामोद्योग मंडळास अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये १०० कोटी एवढा नियतव्यय राखून ठेवला आहे.

५१. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून पंचायतराज व्यवस्थेचा पाया असलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंचांचे मानधनामध्ये लक्षणिय वाढ करण्याचे प्रस्तावित असून यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये २०० कोटी एवढा निधी राखून ठेवण्यात येत आहे.

**प्रधानमंत्री आवास योजना.**

५२. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत एसइसीसी च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील पात्र लाभार्थ्यांची संख्या १२ लक्ष ३९ हजार ९०८ एवढी आहे. त्यापैकी आतापर्यंत ५ लक्ष ७८ हजार १०९ लाभार्थ्यांना घरे मंजूर करण्यात आली असून, त्यापैकी ४ लक्ष २१ हजार ३२९ घरे बांधण्यात आली आहेत. उर्वरित ६ लक्ष ६१ हजार ७९९ लाभार्थ्यांनाही घर मंजूर करण्याचे नियोजन आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नागरी भागात सन २०२२ पर्यंत १९ लाख ४० हजार घरकुल निर्मीतीचे उद्दिष्ट निश्चित केलेले असून सद्य:स्थिती २६ लाख नागरिकांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नोंदणी केलेली आहे. सन २०१६-१७ ते सन २०१८-१९ या कालावधीत मंजूर झालेल्या घरकुलांची संख्या ११ लक्ष ८ हजार ८१० इतकी आहे. घरकुल बांधकामाकरिता अंमलबजावणी यंत्रणेला आतापर्यंत १ हजार ३८६ कोटी ६८ लक्ष इतका निधी वाटप करण्यात आलेला आहे.

**दिव्यांगासाठी घरकूल योजना.**

५३. दिव्यांग हा समाजातील अविभाज्य घटक आहे. त्याला सन्मानाने जगता यावे यासाठी ८० टक्के दिव्यांग असलेल्या व्यक्तींना शासन घरकूल बांधून देईल. यासाठी रुपये १०० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी गृहनिर्माण विभागाकरिता रुपये ७ हजार १९७ कोटी ६८ लक्ष ३४ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.**

५४. ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी या नात्याने एस.टी वर्षानुवर्षे सामान्य माणसांच्या सेवेत कार्यरत आहे. “ गांव तेथे एस.टी ” हे राज्य परिवहन महामंडळाचे ब्रीद वाक्य आहे. सार्वजनिक प्रवासी वाहतुकीच्या माध्यमातून राज्यातील ९१.७ टक्के गावाशी परिवहन सेवा जोडली गेलेली आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक, कर्क रुग्ण, स्वातंत्र्यसैनिक इत्यादी प्रवाशांना बस प्रवास भाड्यात सवलत देण्यात येते. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे सार्वजनिक बस वाहतुकीचा कणा असून राज्य परिवहन महामंडळाचे

राज्यात ५७८ बसस्थानके आहे. मागील ३ वर्षात १२९ बसस्थानकांच्या आधुनिकीकरणाचे प्रस्ताव असून त्यापैकी ३९ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. ७० बसस्थानकांची कामे प्रगतीपथावर आहेत. या नुतनीकरणाच्या कामाकरिता रुपये १३६ कोटी ५१ लाख इतका खर्च करण्यात आलेला आहे.

**तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी बस स्थानकाचे आधुनिकीकरण.** ५५. भक्तीभावाला आनंदाची जोड देण्यासाठी तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी सध्या असलेल्या बस स्थानकांचे सर्व सोयींनी परिपूर्ण अशा बस स्थानकांत रुपांतरित करण्याचा शासनाचा मानस आहे. याकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये १०० कोटी नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

**बस खरेदी.** ५६. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास ७०० बस खरेदी करण्यासाठी अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला असून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रुपये ५० कोटी एवढा निधी महामंडळास उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये १६० कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

**मराठवाडा विभागास एकात्मिक ग्रीड पद्धतीने पाणीपुरवठा.** ५७. मराठवाडा विभागास सातत्याने दुष्काळास सामोरे जावे लागते. या अनुषंगाने पिण्याच्या पाण्याबाबत कायमस्वरुपात उपाययोजना करण्याचा शासनाचा मानस आहे. पिण्याचे पाणी, शेती व उद्योगासाठी दुष्काळ सदृष्य परिस्थितीतही पाणी कमी पडू नये याकरिता एकात्मिक ग्रीड पद्धत वापरुन पाणी टंचाईवर मात करणे शक्य आहे. त्याअनुषंगाने आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

## मनुष्यबळ विकास

**उच्च शिक्षण.** ५८. महाराष्ट्राच्या ग्रंथालय परंपरेचा समृध्द वारसा जोपासणाऱ्या एशियाटीक ग्रंथालयाचे डिजीटायजेशन करण्याकरिता रुपये ५ कोटी एवढा निधी संस्थेला उपलब्ध करुन देण्यात आला आहे. राज्यातील ८ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ई-ग्रंथालयात रुपांतरित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम.** ५९. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये शिक्षकांना त्यांच्या संबंधित क्षेत्राचे अद्ययावत ज्ञान शैक्षणिक पद्धती व तंत्रज्ञान यांनी समृद्ध करुन शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी येत्या ५ वर्षाच्या कालावधीत ५० हजार शिक्षकांना प्रशिक्षित व प्रोत्साहित करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये १० कोटी नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे.

**कै. बाळ आपटे, सेंटर फॉर स्टडिज इन स्टूडंट ॲन्ड युथ मुव्हमेंट.**

६०. विद्यार्थी चळवळीचा अभ्यास करण्यासाठी कै. बाळ आपटे, सेंटर फॉर स्टडिज इन स्टूडंट ॲन्ड युथ मुव्हमेंट नावाचे केंद्र मुंबई विद्यापीठांतर्गत स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. दृष्य कलेच्या क्षेत्रात महत्वाचे योगदान देणाऱ्या नामवंत व ज्येष्ठ कलाकारांचा यथोचित सन्मान करण्याकरिता " कै. वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार " देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**सर जे. जे. कला, वास्तुशास्त्र आणि उपयोजित कला महाविद्यालयाच्या पायाभुत सुविधांकरिता अनुदान.**

६१. सर जे. जे. कला, वास्तुशास्त्र आणि उपयोजित कला ही तीन महाविद्यालये एकाच प्रांगणात असून, या तीनही महाविद्यालयांनी प्रतिभावान कलावंतांच्या अभिव्यक्तीला आकार देत कलावंतांची एक मोठी पिढी घडविली आहे. या मालिकेत अनेक श्रेष्ठांची नावे घेता येईल. नर्मदा तिरावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा जगातील सर्वाधिक उंच पुतळा (Statue of Unity) निर्माण करुन कलेचा आदर्श मापदंड निर्माण करणारे पद्मश्री श्री. राम सुतार यांचा अभिमानाने उल्लेख करावा लागेल. अशा श्रेष्ठांच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या या महाविद्यालयांच्या आवश्यक सुविधांकरिता रुपये १५० कोटी इतका निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यापैकी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता रुपये २५ कोटी इतका नियतव्यय राखून ठेवला आहे.

## क्रीडा

**विभागीय व जिल्हा क्रीडा संकुलाचा कायापालट.**

६२. सर्वांसाठी खेळाद्वारे सुदृढता हा केंद्रबिंदू ठरवत आबालवृद्धांमध्ये आरोग्यसंपन्न कार्यक्षम जीवनाचे महत्त्व बिंबविण्यासाठी क्रीडा विकासाला चालना मिळणे अत्यंत गरजेचे आहे. विभागीय व जिल्हा क्रीडा संकुलांमध्ये आवश्यक त्या क्रीडा सुविधा निर्माण करण्याची नितांत आवश्यकता आहे. सन २०२४ मध्ये होणाऱ्या ऑलिंपिकमध्ये महाराष्ट्रातील खेळाडूंनी जास्तीत जास्त पदके प्राप्त करावी यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा निर्माण करण्याकरिता विशेष धोरण राबविण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी शासनामार्फत रुपये ३०० कोटी खर्च करण्याचे प्रस्तावित असून त्यापैकी रुपये १५० कोटी चालू वर्षात उपलब्ध करून देण्यात येतील.

औरंगाबाद जिल्ह्यात करोडी येथे राज्यस्तरीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करणे तसेच वाळुंज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडांगण तयार करण्याचा मानस आहे.

## वैद्यकीय शिक्षण

नविन वैद्यकीय महाविद्यालये.

६३. राज्यात चंद्रपूर, गोंदिया व जळगांव येथे नविन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून मान्यता देण्यात आलेली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर येथील महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामाकरिता रुपये ६१४ कोटी ६७ लाख इतका निधी लागणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथील महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामाकरिता रुपये ४४८ कोटी ७० लाख इतका निधी लागणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव येथील महाविद्यालय, रुग्णालय व वसतीगृह इमारत बांधकामाकरिता रुपये ४५८ कोटी ८५ लाख इतका निधी लागणार आहे. सदर तिनही महाविद्यालयाच्या बांधकामाकरिता रुपये १५२२ कोटी २३ लाख इतका निधी अपेक्षित आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाकरिता रुपये ३ हजार ९८० कोटी ८७ लक्ष १२ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

## सार्वजनिक आरोग्य

प्रधानमंत्री जनआरोग्य आणि महात्मा फुले जनआरोग्य योजना राज्यात संयुक्तपणे राबविण्याबाबत.

६४. राज्यात सुरु असलेल्या महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेसोबत केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेची एकत्रितरित्या अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासून राज्यातील ८३ शासकीय रुग्णालयात लागू करण्यात आली आहे. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये २ कोटी २३ लक्ष लाभार्थी असून यापैकी ८३.७२ लाभार्थी प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून ६० टक्के व राज्य शासनाकडून ४० टक्के निधी उपलब्ध करून देण्यात येतो. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९७१ उपचार समाविष्ट असून प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत एकूण १३०० उपचार अनुज्ञेय आहेत.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकरिता रुपये १० हजार ५८१ कोटी ७९ लक्ष ५१ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

## सामाजिक सेवा

निराधार अनुदान योजना व निवृत्तीवेतन योजना.

६५. विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीता, दिव्यांग व निराधार या सर्व दुर्बल घटकांच्या कल्याणाला प्राधान्य देत आमचे शासन कार्यरत आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत दिव्यांगांच्या निवृत्ती वेतनात दिव्यांगत्वाच्या प्रमाणानुसार वाढ करण्यात आलेली आहे.

वृद्ध, निराधार, दिव्यांग व विधवा या सर्व दुर्बल घटकांना मदतीचा हात देत त्यांचे जीवन सुसह्य करण्यासाठी संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ योजनेअंतर्गत सध्या दरमहा मिळत असलेल्या रुपये ६०० इतक्या अर्थसहाय्यावरुन रुपये १००० इतके अर्थसहाय्यात वाढ करण्यात येत आहे. या योजनेत विधवा लाभार्थ्यांना १ अपत्य असल्यास प्रतिमाह रुपये ११०० व २ अपत्ये असल्यास रुपये १२०० इतके अर्थसहाय्य देण्याचे प्रस्तावित असून, यासाठी सुमारे रुपये १ हजार ५०० कोटी इतका आर्थिक भार शासनावर येणार आहे.

वर्धा, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविणे.

६६. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या वास्तव्याने पुनित झालेला वर्धा जिल्हा हा महाराष्ट्रातील दारुबंदी असलेला पहिला जिल्हा आहे. सध्या विदर्भातील वर्धा, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यामध्ये दारुबंदी आहे. या तीनही जिल्ह्यात व्यसनमुक्तीचा कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये ५० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आलेला आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव.

६७. आपल्या साहित्यातून सामान्य माणसांच्या दु:खाला वाचा फोडणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाप्रित्यर्थ राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरिता रुपये १०० कोटी एवढा नियतव्यय राखुन ठेवण्यात आलेला आहे.

स्वयंसेवी संस्थांना अनुदान.

६८. राज्यातील सामाजिक न्याय, विजाभज, महिला व बालविकास विभाग, आणि आदिवासी विकास विभागाअंतर्गत येणाऱ्या अनुदानीत संस्थामधील विद्यार्थ्यांच्या आणि इतर प्रवेशीतांच्या परीपोषण आहारात रुपये ९०० वरून रुपये १५०० आणि एच.आय.व्ही बाधितनिवासी विद्यार्थ्याचे अनुदान रुपये ९९० वरुन रुपये १६५० करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत महिलांसाठी स्वयंरोजगार योजना.

६९. विधवा, परित्यक्त्या, घटस्फोटीत महिला यांच्या आयुष्यातील आर्थिक ताण हा अनेकदा भिषण ठरतो. या महिलांना आधार देणे व स्वयंपूर्ण, स्वावलंबी बनविणे हे सामाजिक कर्तव्य ठरते. त्या दृष्टीने एक स्वयंरोजगार योजना तयार करुन या योजनेतून पहिल्या वर्षी रुपये २०० कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकरिता रुपये १२ हजार ३०३ कोटी ९४ लक्ष ३४ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

## विजा भज, इमाव व विमाप्र

इतर मागास वर्ग (ओबीसी) महामंडळासाठी अनुदान.

७०. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) लाभार्थ्यांना लाभ देण्याकरिता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास रुपये २०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता वसतीगृहे.

७१. इतर मागासप्रवर्गातील (ओबीसी) मुलांसाठी १८ आणि मुलींसाठी १८ अशी एकूण ३६ वसतीगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या बाबीकरिता सन २०१९-२० या वर्षात रुपये २०० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवलेला आहे.

शिष्यवृत्ती योजना.

७२. इयत्ता ५ वी ते १० वीत शिकणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेंतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना दरमहा रुपये ६० तर इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना दरमहा रुपये १०० याप्रमाणे शिष्यवृत्ती मिळणार आहे. या योजनेचा लाभ डीबीटीद्धारे २ लक्ष २० हजार विद्यार्थीनींना होणार आहे.

इतर मागास प्रवर्गामधील इयत्ता १० वी आणि १२ वी च्या गुणवंतांचा स्व.वसंतराव नाईक पुरस्काराने गौरव.

७३. राज्यातील इयत्ता १० वी आणि १२ वी च्या परीक्षेत राज्यातून व विभागातून सर्वप्रथम येणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थीनींना स्व.वसंतराव नाईक पुरस्कार अनुक्रमे रुपये १ लक्ष व रुपये ५१ हजार रोख रक्कम देवून गौरवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम.

७४. गेली अनेक वर्षे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या धनगर समाजाच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने शासन वचनबद्ध आहे. आदिवासी समाजाच्या उन्नतीकरिता ज्या योजना राबविल्या जातात त्याच धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी विविध २२ योजना राबविण्याचा शासनाचा मानस आहे. यात प्रामुख्याने भटकंती करणाऱ्या भूमिहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्धबंदिस्त, बंदिस्त मेंढीपालनासाठी जागा उपलब्ध करून देणे किंवा जागा खरेदीसाठी अनुदान तत्वावर अर्थसहाय्य देण्याचे तसेच मेंढ्यांसाठी विमा संरक्षण प्रस्तावित आहे. वसतीगृह प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांना स्वयंसहाय्य योजना, गुणवंत विद्यार्थ्यांना स्वाधार योजना, शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश देणे, परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू करणे इत्यादी योजना लागू करण्याचे विचाराधीन आहे. याशिवाय या समाजातील बेघरांना पहिल्या टप्प्यात १० हजार घरकूल बांधून देणे व अन्य काही विशेष सुविधा उपलब्ध करून देवून धनगर समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा दृढसंकल्प आहे. यासाठी रुपये १ हजार कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. सदरची तरतूद राज्याच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पातून करण्यात येत असून त्यामुळे आदिवासी विकास विभागासाठी राखून ठेवलेल्या नियतव्ययावर कोणताही परिणाम होणार नाही.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी विजा भज, इमाव व विमाप्र विभागाकरिता रुपये २ हजार ८१४ कोटी ७१ लक्ष १८ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना.

७५. आदिवासी भागातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना आठवड्यातून सहा वेळचा चौरस आहार देण्यात येत असून दरमहा १ लक्ष ५२ हजार महिलांना याचा लाभ देण्यात येत आहे. ८.३७ लक्ष बालकांना आठवडयातून चार वेळा अंडी, केळी, पोषण आहाराअंतर्गत उपलब्ध करून देण्यात येत आहे. या योजनेकरिता साधारण रुपये १४० कोटी इतका प्रतिवर्ष खर्च करण्यात येत आहे.

७६. शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत मागील चार वर्षात ३६ हजार १८१ इतक्या लाभार्थ्यांना घरासाठी रुपये ५२४ कोटी ३४ लक्ष अनुदान देण्यात आलेले आहे.

ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत मागील चार वर्षात रुपये ७७७ कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे.

राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ टक्के अबंध निधी थेट देण्यात येतो. सन २०१५-१६ पासून २ हजार ८८० ग्रामपंचायतींना रुपये ७९७ कोटी ७ लक्ष एवढा निधी शासन स्तरावरुन थेट देण्यात आलेला आहे.

नामांकित निवासी शाळेत आजमितीस ५३ हजार ३५३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. याकरिता प्रतिवर्ष सुमारे रुपये ३५० कोटी इतकी तरतूद करण्यात येत आहे.

राज्यातील शासकीय वसतिगृहामध्ये ५६ हजार ३३८ विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याकरिता प्रतिवर्ष सुमारे ५०० कोटी इतका खर्च करण्यात येत आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी आदिवासी विकास विभागाकरिता रुपये १० हजार ७०५ कोटी ४ लक्ष ४ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

अल्पसंख्याक महिला व युवकांना रोजगार.

७७. राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील महिला व युवकांना विविध रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम, तंत्रशिक्षण व इतर रोजगार उपयोगी साहित्य देण्याकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये १०० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आलेला आहे. तसेच अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरिता ४६० प्रवेश क्षमतेची आणि २ तुकड्यांचे १० व्यवसाय अभ्यासक्रम असलेली नवीन औद्योगिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था मालेगाव, जिल्हा नाशिक येथे सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रज्वला योजना. ७८. राज्यातील सर्व महिला बचत गटातील महिलांची कायदेविषयक सामाजिक, आर्थिक ज्ञानाबाबत जनजागृती करण्याकरिता महाराष्ट्र महिला आयोगामार्फत नवीन प्रज्वला योजना राबविण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी रुपये ५ कोटी एवढा नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

नवतेजस्वीनी योजना. ७९. ग्रामीण महिलांचा जीवनस्तर उंचावत त्यांच्या उद्यमशिलतेला वाव देत प्रगतीचा नवीन टप्पा त्यांच्या आयुष्यात यावा यासाठी नवतेजस्वीनी ही योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. नवतेजस्वीनी ग्रामीण महिला सक्षमीकरण या कार्यक्रमांतर्गत ३६५ लोकसंस्थांची उभारणी करून त्या स्वबळावर उभ्या राहिल्या. नवतेजस्वीनी ग्रामीण उपजिविका विकास हा रुपये ५२८ कोटी ५५ लक्ष किमतीचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. यातून १० लाख कुटुंबे दारिद्र्यातून बाहेर येवून आपत्कालिन स्थितीतही तग धरु शकतील. या योजनेत राज्य शासनास रुपये ३३५ कोटी ४० लक्ष कर्ज आयफाड कडून प्राप्त होणार आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील ५ लक्ष बचत गटांची चळवळ अधिक गतिमान होणार असून राज्यातील महिला सक्षमीकरणाशी निगडीत उपक्रमांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणार आहे.

८०. पोलिस दलांचे सक्षमीकरण करण्याकरिता १८ हजार ९२२ पोलिस शिपायांची रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच ४ हजार ६४९ पदे यावर्षी भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. राज्यातील नक्षलवादी कारवायासंदर्भात आळा घालण्यासाठी अत्याधुनिक यंत्रे, उपकरणे व तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल. त्याचबरोबर पोलिसांना आवश्यक सुविधा व अधिकार उपलब्ध होण्यासाठी सर्वंकष कार्यक्रम राबविण्यात येईल. यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

महिला सुरक्षितता पुढाकार योजना. ८१. महिलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासह त्यांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याकरिता महिला सुरक्षितता पुढाकार योजना तीन वर्षाच्या कालावधीकरिता राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून या योजनेवर रुपये २५२ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सीसीटीएनएस प्रकल्प.

८२. गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्याकरिता नेटवर्क व यंत्रणा (Crime and Criminal Tracking network system) हा प्रकल्प मिशन मोड प्रकल्प म्हणून संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून नागरिकांना १४ सेवा व मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून १० सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. या योजनेकरिता रुपये ११० कोटींचा खर्च अपेक्षित असून वार्षिक आवर्ती खर्च रुपये ५० कोटी अपेक्षित आहे.

ई-चलान.

८३. संपूर्ण राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यास व त्याअनुषंगाने रुपये ५९ कोटी एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. राज्यातील ३२ शहरांमध्ये सदर प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांची सुरक्षा.

८४. शिर्डी येथे विविध राज्यांतून, परदेशातून लाखो भाविक येत असतात. या भाविकांना आंतरराष्ट्रीय दर्जाची सुरक्षा व अन्य व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी गृह, नगरविकास, परिवहन व शिर्डी संस्थान यांच्या समन्वयातून पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येईल. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच सिंधुदुर्ग, औरंगाबाद व नागपूर या तीन जिल्ह्यात आणि शिर्डी, मुंबई या आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळी "पर्यटन पोलिस" ही संकल्पना राबविण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

सावंतवाडी येथे सुरक्षारक्षक प्रशिक्षण केंद्र.

८५. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक महामंडळाकडून सुरक्षारक्षक प्रशिक्षण केंद्र मंजूर करण्यात आले असून या माध्यमातून अनेक जनांना सुरक्षाविषयक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी गृह, परिवहन, बंदरे, तुरुंग व राज्य उत्पादन शुल्क विभागाकरिता रुपये २१ हजार ७०६ कोटी २१ लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

राज्यातील कोतवालाच्या मानधनात वाढ.

८६. ग्रामीण भागातील महसूल व्यवस्थेचा कणा समजल्या जाणाऱ्या राज्यातील कोतवालाच्या मानधनामध्ये ५० टक्क्यापेक्षा अधिकची वाढ करण्यात आलेली आहे. ५० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या कोतवालाच्या मानधनात तिप्पटीने वाढ करण्यात आली आहे. यासोबतच आरोग्य, अपघात व निवृत्तीवेतनाच्या योजना लागू करुन राज्यातील कोतवालांना सामाजिक सुरक्षा देण्यात आली आहे. महसूल विभागातील गट ‘ड’ च्या पदभरतीमध्ये ४० टक्के पदे कोतवालांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

मुद्रांक शुल्क अभय योजना.

८७. हस्तांतरणाचे दस्त योग्य मुद्रांकित केले नसल्यास त्यावर प्रतिमाह २ टक्के दंड आकारण्याची तरतूद आहे. सदनिकाधारक तसेच गृहनिर्माण संस्थांना दिलासा देण्यासाठी दंडाच्या रक्कमेत ९० टक्के सूट देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

नझूल जमिनी फ्रि-होल्ड करण्यास मान्यता.

८८. नागपूर व अमरावती विभागातील लिलावाद्वारे अथवा अन्य प्रकारे भाडेतत्वावर दिलेल्या जमिनीचे संबंधितास मालकी हक्क देण्यासाठी सदर जमिनी फ्रि-होल्ड करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

नक्षलग्रस्त भागात रोजगाराचा विशेष कार्यक्रम.

८९. राज्यातील गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या जिल्ह्यांच्या नक्षलग्रस्त भागातील युवकांनी नक्षलग्रस्त चळवळींपासून दूर राहून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कौशल्य विकासाचा विशेष कार्यक्रम राबविण्याचे प्रस्तावित असून याकरिता पुढील ३ वर्षात रुपये ५०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. सन २०१९-२० मध्ये या कार्यक्रमासाठी रुपये १५० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आलेला आहे.

दहावी व बारावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास योजना.

९०. दहावी व बारावीची परीक्षा तरुण-तरुणींच्या आयुष्याला वळण देणारा एक मोठा टप्पा आहे. या टप्प्यावर अनेक तरुण-तरुणी अनुत्तीर्ण होतात. समोरच्या भविष्याच्या वाटचालीत अडथळे निर्माण होतात. अशा तरुणांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि स्वत:च्या पायावर उभे राहण्याची क्षमता

निर्माण होण्यासाठी या विद्यार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे.

शाश्वत विकास ध्येय. ९१. संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक स्तरावर गरीबी निर्मुलन, पर्यावरण संरक्षण, आरोग्य व शिक्षणस्तरात वाढ इ. महत्वाच्या मुद्यावर १७ शाश्वत विकास ध्येय सन २०३० पर्यंत साध्य करण्याचे योजिले आहे. याबाबतीत राज्यस्तरावर परिणामकारक अंमलबजावणी, मुल्यमापन व नियंत्रण करता यावे म्हणून नियोजन विभागाच्या अधिनस्त " SDG Implementation & Coordination Center" ची स्थापना करण्यात येणार आहे. याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची पुनर्रचना. ९२. सांख्यिकी माहितीचे संकलन, तांत्रिक समन्वय व सांख्यिकी प्रणालीचा विकास साधने, नियोजन प्रक्रियेमध्ये सांख्यिकीची वाढती मागणी व माहितीचे विश्लेषण करण्याची आवश्यकता इत्यादि बाबी तसेच सांख्यिकी संग्रहण अधिनियम, २००८ ची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची पुनर्रचना व बळकटीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी आवश्यक तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल.

महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजना. ९३. महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असलेल्या भारताच्या सैन्य दलातील शौर्य किंवा सेवापदक धारकांना १ पेक्षा जास्त पदके प्राप्त झाल्यास महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेंतर्गत त्यांच्या सर्व पदकांना दिनांर २९ सप्टेंबर, २००१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने स्वतंत्र अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**स्मारके**

थोर व्यक्तींच्या स्मारकांची कामे. ९४. " स्वातंत्र्य हा माझा जन्मसिध्द अधिकार असून तो मी मिळवणारच " असे इंग्रज सरकारला ठणकावून सांगणारे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे प्रणेते, भारतमातेचे सुपुत्र लोकमान्य टिळक यांचा महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे पुतळा बसविण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

भारताच्या स्वातंत्र्य युद्धात अतुलनीय पराक्रम गाजविणारे क्रांतीकारक खाजाजी नाईक यांचे धरणगाव, जि. जळगाव येथे, ज्येष्ठ रंगकर्मी कै. श्री. मच्छिंद्र कांबळी यांचे कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथे, श्री. शिवरामराजे भोसले यांचे सावंतवाडी, जि. सिंधुदूर्ग येथे, वीर भागोजी नाईक यांचे नांदूर शिंगोटे ता. सिन्नर, जि. नाशिक येथे, वीर नाग्या कातकरी यांचे चिरनेर, जि. रायगड येथे, वीर बाबुराव शेडमाके यांचे घोट, जि. गडचिरोली येथे, जंगल सत्याग्रहात वीरमरण आलेल्या १०० जनजाती वीरांचे चनकापूर ता. कळवण, जि. नाशिक येथे, रावलापाणी स्वातंत्र्य संग्रामाचे रावलापाणी, जिल्हा नंदुरबार येथे स्मारक उभारण्याचा शासनाचा मानस आहे. तसेच सरसेनापती वीर बाजी पासलकर यांचे पानशेत ता. वेल्हे, जि. पुणे येथील स्मारकाची दुरुस्ती करण्याचा मानस आहे. यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये ५० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

**भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक.**

९५.

भारत जमीन का टुकडा नही
जीता जागता राष्ट्रपुरुष है
हम जीयेंगे तो इसके लिये
मरेंगे तो इसके लिये......

भारतमाते प्रती समर्पणाची भावना आपल्या कवितेतून व्यक्त करत आपल्या आयुष्याचे मोल त्यामागे उभे करणारे, ज्यांची वाणी आयुष्यभर कवितेसारखी झरत राहिली आणि ज्यांच्या व्यक्तीमत्वातून राष्ट्र आणि समाजाचे चिंतन प्रकट होत राहिले, आपल्या अतुलनीय कर्तृत्वाने आणि विकासाभिमुख दृष्टीने भारतीय विकासावर आपली अमिट मुद्रा उमटविणारे देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक स्वर्गीय यशवंतराव चव्हाण आणि स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या धर्तीवर मुंबईत उभारण्याचा संकल्प शासनाने केला आहे.

९६. मराठी साम्राज्याच्या पराक्रमाचा मानबिंदू म्हणजे रायगड किल्ला. आपल्या अभेद्य तटबंदीने आजही या वैभवाचे साक्ष देणाऱ्या रायगड किल्ल्याचे जतन व संवर्धन करण्याकरिता रुपये ६०६ कोटी एवढ्या योजनेच्या खर्चास मान्यता दिलेली असून आतापर्यंत रुपये ५९ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**शिवसृष्टी प्रकल्प.**

९७. महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठाण, आंबेगाव (बु.) ता. हवेली, जि. पुणे येथे युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ओजस्वी जीवनावरील “ शिवसृष्टी ” ची निर्मिती होत आहे. या प्रकल्पासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये ५० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**बालरंगभूमीला प्रोत्साहन.**

९८. बालरंगभूमीची समृद्ध परंपरा मराठी रंगभूमीचे वैभव आहे. शासनाद्वारे कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर या पाच विभाग स्तरावर राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी आयोजित केली जाते. या स्पर्धेला स्पर्धक संस्थांचा मोठा प्रतिसाद लाभत असून सरासरी ६० पेक्षा अधिक बालनाट्य प्रत्येक केंद्रावर सादर होतात. बालकलावंतांना प्रोत्साहन मिळावे व बालरंगभूमी अधिक समृद्ध व्हावी यादृष्टीने अस्तित्वातील पाच केंद्रांची संख्या वाढवून ती दहा करण्याचा शासनाचा मानस आहे.

**पत्रकार कल्याण.**

९९. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. मराठी पत्रकार सृष्टीचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेसाठी शासनाने रुपये १५ कोटी मुदतठेवीसाठी दिले आहेत. त्यातून राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांसाठी सन्मान योजना राबविण्यात येत आहे. राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांची संख्या लक्षात घेता या मुदतठेवीत आणखी रुपये १० कोटींची तरतूद करीत आहोत. आता या सन्मान योजनेसाठी रुपये २५ कोटी उपलब्ध होतील.

तसेच शासनाने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत पत्रकारांचा आणि त्यांच्या कुटुंबियांचा समावेश केला आहे. या योजनेचा लाभ अंदाजे ८ हजार पत्रकारांना होणार असून विमा हप्त्याची ही रक्कम अदा करण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

## अन्न व नागरी पुरवठा

चूलमुक्त महाराष्ट्र धुरमुक्त महाराष्ट्र.

१००. भारतीय स्त्रीला धूरमुक्त वातावरणात जगता यावे यासाठी देशात उज्वला योजनेच्या रुपाने मोठे अभियान राबविल्या जात आहेत. त्याचा फायदा देशातील मोठ्या जनसमुहाला झाला. महाराष्ट्रात उज्वला गॅस योजना, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना व एलपीजी गॅस वितरणाच्या अन्य योजनांच्या लाभापासून जी कुटुंबे वंचित राहिली आहेत अशा कुटुंबांना गॅस जोडणी उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे. राज्यातील मातृशक्तीला वंदन करुन येत्या आर्थिक वर्षात ही योजना पुर्ण करण्याचे नियोजित आहे. सदर योजना शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हे, नक्षलग्रस्त जिल्हे व आकांक्षित जिल्ह्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात येईल. यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये १०० कोटी नियतव्यय राखून ठेवण्यात येत असून आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध केला जाईल.

## विधी व न्याय

१०१. राज्यातील जनतेला जलदगतीने न्याय मिळण्यासाठी मागील चार वर्षात १८ अतिरिक्त न्यायालये, २४ जलदगती न्यायालये, १४ कौटूंबिक न्यायालये सुरु करण्यात आली आहेत.

१०२. मागील चार वर्षात राज्यातील १०३ जिल्हास्तरिय व इतर न्यायालयीन इमारतींची बांधकामे पूर्ण करण्यात आली असून त्यावर रुपये ८१० कोटी इतका

खर्च झालेला आहे. तसेच १०२ न्यायाधिशांच्या निवासस्थान इमारतीची बांधकामे पूर्ण करण्यात आली असून त्यावर रुपये ९२ कोटी ११ लक्ष इतका खर्च करण्यात आलेला आहे. राज्यातील उच्च न्यायालय व इतर न्यायालयातील इमारती बांधकामाकरिता राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी विधी व न्याय विभागाकरिता एकत्रित रुपये २ हजार ७४५ कोटी ४८ लक्ष ८४ हजार तरतूद प्रस्तावित आहे.

## वने

**वनीकरण कार्यक्रम.** १०३. जागतिक तापमानात सातत्याने होणारी वाढ, हवामान आणि ऋतुबदल, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष आणि इतर नैसर्गिक आपत्ती यांची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी वृक्ष लागवडीशिवाय पर्याय नाही, ही बाब जागतिक स्तरावर मान्य झाली आहे. हे लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने हरित महाराष्ट्र ही संकल्पना राबविण्याच्या दृष्टीने सन २०१७ ते सन २०१९ या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये ५० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाची आखणी केली. जागतिक वनस्थिती अहवाल २०१७ नुसार सन २०१५ च्या तुलनेत सन २०१७ मध्ये वृक्षाच्छादित क्षेत्रात २७ हजार ३०० हेक्टरने वाढ झाली आहे. कांदळवन क्षेत्र, जलव्याप्त क्षेत्र व बांबूप्रवण क्षेत्रात सुद्धा लक्षणीय वाढ झाली आहे. वाघांच्या संख्येत २५ टक्के वाढ झाली आहे. वन विभागाच्या या प्रगतीला वृक्षारोपण मोहिमेचे मोठे पाठबळ लाभले आहे. राज्यात लोकसहभागाच्या बळावर विक्रमी वृक्ष लागवड करण्यात आली. या मोहिमेला लोक चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने या विक्रमाची सलग दोन वर्षे नोंद घेतली. यावर्षी १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत ३३ कोटी वृक्ष लागवड करण्याचा संकल्प शासनाने केला आहे. या संकल्पाला सुद्धा जनतेची अशीच साथ लाभावी असे नम्र आवाहन मी करित आहे.

वाघ आणि बिबट ह्यांच्या प्रादुर्भावामुळे वनालगत असलेल्या गावामध्ये अलिकडे वारंवार होत असलेल्या मनुष्यहानी आणि वाढणाऱ्या पिक नुकसानीच्या घटना लक्षात घेता, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेची व्याप्ती वाढवून वनालगतच्या गावातील वन सीमेवर साखळी जाळीचे कुंपन घालण्याचे प्रस्तावित आहे. या बाबीकरिता सन २०१९-२० मध्ये रुपये ५० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

**अटल आनंदवन योजना.**

१०४. पर्यावरणाच्या असमतोलाचे गंभीर परिणाम आज सारे जग अनुभवत आहे. यासाठी वृक्ष लागवड हा एक महत्त्वाचा उपाय आहे. म्हणूनच वृक्ष लागवड हा सर्वांचा सहजभाव झाला पाहिजे. कमी जागेत अधिक वृक्ष लावून मियावाकी पद्धतीने घनदाट जंगल निर्माण करता येते. जिथे एक हेक्टरवर एक हजार झाडे लावता येतात, तिथे या पद्धतीने तीस हजार झाडे लावता येतील. शहरामध्ये जागेची कमतरता असते, तेथे या पद्धतीने कमी जागेत अधिक वृक्ष लागवड करुन जंगल निर्माण करता येईल. ही पद्धत शहरी जीवनासाठी आनंददायी व पर्यावरणपूरक ठरावी यासाठी अटल आनंदवन योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे.

**ऐरोली, नवी मुंबई येथे कांदळवन व सागरी जैवविविधता प्रकल्प.**

१०५. ऐरोली येथील कांदळवन व सागरी जैवविविधता जोपासण्याच्या प्रकल्पासाठी रुपये ३० कोटी एवढे अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे.

**राज्याची कर्जाची स्थिती.**

१०६. मार्च २०१९ अखेर सुधारित अंदाजानुसार राज्यावरील एकूण कर्जाची रक्कम रुपये ४ लक्ष १४ हजार ४११ कोटी एवढी आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचे आकारमान पाहता हे कर्ज वाजवी प्रमाणात असल्याचे वित्तीय निर्देशांकावरुन दिसून येईल.

**प्रत्यक्ष खर्च सन २०१७-१८ सुधारित अंदाज सन २०१८-१९.**

१०७. सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रुपये ४ हजार ५११ कोटी १९ लक्ष एवढी महसुली तूट अपेक्षित होती. तथापि प्रत्यक्षात राज्य रुपये २ हजार ८२ कोटी एवढे महसुली शिलकीत राहिले. सन २०१८-१९ मध्ये महसुली तूट रुपये १५ हजार ३७५ कोटी एवढी अपेक्षित होती. तथापि सुधारित अंदाजात ती कमी होवून

रुपये १४ हजार ९६० कोटी एवढी दिसून येईल. परंतु प्रत्यक्षात यातही घट होवून राज्य महसुली शिलकीतच दिसेल असा मला विश्वास आहे.

**अर्थसंकल्पीय अंदाज सन २०१९-२०.**

१०८. दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ रोजी अंतरिम अर्थसंकल्प रुपये ४ लक्ष ३ हजार २०७ कोटी एवढ्या रकमेचा सादर केला होता. आता नवीन बाबीद्वारे रुपये १ हजार ५८६ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

सन २०१९-२० या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा रुपये ३ लाख १४ हजार ६४० कोटी १२ लाख व महसुली खर्च रुपये ३ लाख ३४ हजार ९३३ कोटी ६ लाख अंदाजित केलेला आहे. महसुली तूट रुपये २० हजार २९२ कोटी ९४ लाख इतकी राहिल.

आता मी अर्थसंकल्पाच्या भाग-२ कडे वळतो.